REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख २१ जानेवारी १९४८ अंक ३

—महाराष्ट्रांतील—
प्रगमनशील व अग्रेसर विमा संस्था

**दि औंध म्युच्युअल इन्शूरन्स सोसायटी लि. पुणें २**

—आमचीं वैशिष्ट्यें—

( १ ) काटकसरीचा कारभार ( २ ) खर्चाचें अल्प प्रमाण ( ३ ) क्लेम्स ताबडतोब पटविणें ( ४ ) एजंटास कायमचें व वंशपरंपरागत कमिशन ( ५ ) माफक हप्त्याचे दर.

विमा अथवा एजन्सी यासाठीं लिहा अगर भेटा.

—मॅनेजिंग डायरेक्टर

**दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड**

हेड ऑफिसः—लालगीर चेंबर्स, फोर्ट, मुंबई.

★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ, विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे. आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

**दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०**

हेड ऑफिसः—पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर ( जि. नाशिक ), खोपोली पे ऑफिसः

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | ... | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,९६,१४५ |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ५५ लाखांवेवर |

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

- ० गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का कर-माफ डिव्हिडंड दिलें.
- ० मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.
- ० बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एन. क्षीरसागर,
आर. बी. साळवेकर,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

**पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८३ | " Cencobank " | नं. ५११ |

मुख्य कचेरीः—लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

# विविध माहिती

**लंडनजवळ भूमिगत तेलाचा सांठा**—खुद्द लंडन शहराच्या खालीं अगर आसपास तेलाचा सांठा असल्याचें समजतें. सांठ्याचें ठिकाण निश्चित करण्यासाठी सध्या प्रयोग चालू आहेत. कांहीं वर्षांपूर्वी सध्याच्या प्रयोगाच्या जागेपासून अर्ध्या मैलावर बोअरनें खोदण्यांत आलें असतां १,६०० फूट खोलीवर तेल सांपडलें होतें. त्याच धोरणानें हल्लीं संशोधन चालू आहे.

**ईस्ट इंडिया कंपनीच्या पुराण्या वस्तु**—ता. ३१ जानेवारी रोजीं मद्रासच्या गव्हर्नरांच्या हस्तें ईस्ट इंडिआ कंपनीच्या मालकीच्या जुन्या-पुराण्या वस्तूंचें एक संग्रहालय मद्रास येथें उघडण्यांत येणार आहे. त्याच दिवशीं पुराण-वस्तु-संशोधन खात्याचें एक प्रदर्शनही उघडण्यांत येईल.

**रशिआंत किंमती खालीं आल्या**—रशिआमध्यें शिधापद्धति तीन आठवड्यांपूर्वी रद्द करण्यांत आली. तेव्हांपासून गेल्या कांहीं दिवसांत कुटुंबागणिक होणारा अन्नावरील खर्च ५० टक्क्यांनीं कमी झाला आहे असें समजतें. शिधापद्धति बंद करतांना बऱ्याच पदार्थांच्या किंमती कमी करण्यांत आल्या होत्या, त्याचा हा परिणाम आहे.

**संपामुळें झालेली कालहानि**—अमेरिकेंत १९४७ सालांत झालेल्या मालक-मजूर भांडणांत ३ कोटी, ५० लाख कामाचे दिवस फुकट गेले असें अमेरिकन मजूर खात्यानें प्रसिद्ध केलें आहे.

**स्थानिक स्वराज्य संस्थांतील सभासद**—पश्चिम बंगालमधील जिल्हा बोर्डस्, युनिअन बोर्डस व नगरपालिका ह्यांतून कांहीं सभासद सरकार नेमीत असे. ही पद्धत ह्यापुढें पश्चिम बंगाल सरकारनें रद्द केली आहे.

**निग्रो शास्त्रज्ञाचा गौरव**—डॉ. जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर ह्या नांवाचा एक निग्रो शास्त्रज्ञ अमेरिकेंत पांच वर्षांपूर्वी मरण पावला. त्याच्या पांचव्या वर्षदिनानिमित्त अमेरिकन सरकारनें ३ सेंटचें खास पोस्टाचें तिकीट काढलें आहे.

**बिहारमध्यें इंग्रजीला निर्बंध**—१९४८ सालापासून बिहार सरकारनें सहाव्या इयत्तेंत इंग्रजी शिकविण्याचें बंद करण्याचें ठरविलें आहे. १९४९ सालीं सातव्या इयत्तेंतही इंग्रजीला बंदी करण्यांत येणार आहे.

**४ लाख वर्षांपूर्वी माणूस होता**—रशिअन पुराण-वस्तु संशोधकांनीं नुकताच असा शोध लावला आहे कीं, पृथ्वीवर ४ लाख वर्षांपूर्वीपासून मनुष्यवस्ती आहे.

**आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना**—आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेच्या एका कमिटीवर अध्यक्ष म्हणून श्री. बी. एन्. आढारकर ह्या हिंदी अर्थशास्त्रज्ञाची निवड झाली आहे. आर्थिक विकासाला सरकारी साह्य कितपत असावें, ह्या प्रश्नाचा वरील कमिटी विचार करणार आहे.

**मासे टिकविण्यासाठी योजना**—किनाऱ्यावरील समुद्रांतून पकडलेले मासे टिकविण्यासाठीं मद्रास सरकारनें ५ कोल्ड स्टोअरेज टँक्स बांधण्याचें ठरविलें आहे. प्रांतांतील अन्नाचा तुटवडा लक्षांत घेऊन पुरवठा वाढविण्याच्या योजनेंतील हा एक भाग आहे. ह्या टँक्समधून जरूरीप्रमाणें मासे मोठ्या शहरीं अगर गांवीं पाठविण्यांत येतील.

**गोवर्धन डेअरी फॉर्म्स लि. चे नवे डायरेक्टर**—गोवर्धन डेअरी फार्म्स लि. च्या वार्षिक सभेनें श्री. सरदार जगन्नाथ महाराज पंडित ह्यांस डायरेक्टर म्हणून निवडलें आहे.

**विद्यार्थ्यांना लष्करी शिक्षण**—संयुक्तप्रांत सरकारनें आंखलेल्या योजनेप्रमाणें अलाहाबाद येथील इंटरच्या वर्गांतील कॉलेजच्या विद्यार्थ्यांपैकीं १,४०० विद्यार्थ्यांना लष्करी शिक्षण देण्यांत येणार आहे.

**औद्योगिक कमिटीची बैठक**—सरकार, मालक आणि मजूर ह्यांचे प्रतिनिधी असलेल्या औद्योगिक कमिटीची पहिली बैठक धनबाद येथें ता. २३ जानेवारीला भरणार आहे. बैठकींत कोळशाच्या खाणीच्या कायद्यांत सुधारणा, तांत्रिक शिक्षण, मजुरांच्या सुखसोयी, प्रॉव्हिडंट फंड व बोनस, इत्यादि प्रश्नांचा विचार करण्यांत येणार आहे.

**अमेरिकेची गेल्या १० वर्षांतील प्रगति**—अमेरिकेनें गेल्या दहा वर्षांत कमालीची आर्थिक मजल मारली आहे. १९३८ चे मानानें आतां १ कोटि, ४० लक्ष अधिक लोक कामावर आहेत. उत्पादन ६६% नें वाढलें आहे. नागरिकांची सरासरी प्राप्ती ५०% नें सुधारली आहे. ह्यांत आणखी भर घालण्याचा अमेरिकनांचा प्रयत्न आहे.

**दि पूना मर्चंट्स टेलर्स को. असोसिएशन लि.**—ही संस्था श्री. मो. ना. पाटसकर ह्यांच्या नेतृत्वाखालीं नुकतीच सहकारी कायद्यान्वयें नोंदविण्यांत आली आहे. तिचा उद्घाटन समारंभ पुण्याचे कलेक्टर श्री. एस. जी. बर्वे, ह्यांचे अध्यक्षतेखालीं शनिवार ता. १० रोजीं पुणें सें. को. बँकेच्या दिवाणखान्यांत झाला.

**हिंदुस्थानसाठी ब्राझिलचा तांदूळ**—ब्रिटन आणि ब्राझिल ह्यांच्यांत झालेल्या करारानुसार हिंदुस्थानला ब्राझिलकडून ३९,००० टन तांदूळ मिळणार आहे. ह्याच कराराप्रमाणें मलायाला २६,३०० टन आणि सीलोनला १०,००० टन तांदूळ मिळणार आहे.

**मद्रास प्रांतांतील धान्य परिस्थिति**—हिंदुस्थानला पाकिस्तानकडून मिळणाऱ्या ४९,००० टन तांदुळापैकीं बराच तांदुळ तांतडीनें मिळावा म्हणून मद्रास प्रांतातर्फे मागणी करण्यांत येणार आहे. ह्या शिवाय मद्रास प्रांताला मध्यवर्ती सरकारकडून १,००,००० टन तांदूळ व १,००००० टन कमी दर्जाचें धान्य मिळण्याचें आश्वासन मिळालेलें आहे. डिसेंबर १९४७ अखेर मद्रास प्रांतांतील तांदुळाची टंचाई १५,००,००० टनांची होती.

**दारूबंदीवरील निर्बंध सैल**—मद्रास प्रांतांत स्थायिक असलेले किंवा मद्रास प्रांतांतून प्रवास करणारे लष्कर दारूबंदीच्या विभागांत असेल तर त्याच्यापुरती दारूबंदीच्या कायद्याची अंमलबजावणी न करण्याचें मद्रास सरकारनें ठरविलें आहे.

**युगोस्लाव्हिआंतील परागंदा मुसलमान**—युगोस्लाव्हिआंतील २,५०० मुसलमान लोक देश सोडण्यास उत्सुक असून, ह्या मुसलमानांना इराकच्या सरकारनें आपल्या देशांत थारा देण्याचें ठरविलें आहे.

### "सहकारी परिषद" पुरवणी

**पुणें येथें भरलेल्या महाराष्ट्र विभाग सहकारी परिषदेंतील स्वागताध्यक्ष व अध्यक्ष ह्यांची संपूर्ण भाषणें, परिषदेनें सम्मत केलेले ठराव, इत्यादि पूर्णपणें देणारी "अर्थ"ची मोठी पुरवणी येत्या अंकाबरोबर प्रसिद्ध केली जाईल.**

# अर्थ

बुधवार, ता. २१ जानेवारी १९४८





प्रो. वा. गो. काळे


संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## नव्या भारताच्या उभारणीसाठी मार्गदर्शक सूचना

### इंजिनिअरांच्या परिषदेंत अध्यक्ष, श्री. एस. बी. जोशी ह्यांचें सडेतोड भाषण

हिंदुस्थान सरकारचे खाणी व बांधकाम मंत्री ना. काकासाहेब गाडगीळ ह्यांनीं, इन्स्टिट्यूशन ऑफ एंजिनिअर्स ह्या संस्थेच्या मुंबई केंद्राच्या २६ व्या वार्षिक अधिवेशनाचें गेल्या आठवड्यांत उद्घाटन केलें. ह्या प्रसंगी मुंबई केंद्राचे नवे अध्यक्ष प्रो. एस. बी. जोशी ह्यांनीं अत्यंत महत्त्वाचे व मार्गदर्शक विचार प्रदर्शित केले.

श्री. जोशी हे स्वतः तज्ज्ञ इंजिनिअर व यशस्वी कॉन्ट्रॅक्टर असल्याकारणानें, ते इंजिनिअरिंगच्या शास्त्राविषयीं किंवा व्यावहारिक धंद्याविषयीं उत्कृष्ट विवेचन केव्हांही करूं शकले असते. परंतु, १५ ऑगस्ट रोजीं मिळविलेल्या स्वातंत्र्यानंतरच्या हिंदुस्थानाच्या भवितव्यास इंजिनिअरांस फार मोठा हातभार लावतां येण्याजोगा आहे हें ओळखूनच श्री. जोशी ह्यांनी आपल्या प्रस्तुत भाषणाच्या विषयाची निवड केली. श्री. जोशी हे स्वतः जसे स्वतःच्या धंद्यांत तज्ज्ञ, तसेच राष्ट्रीय बाण्याचे व स्पष्ट वक्ते असल्याकारणानें त्यांच्या भाषणांत त्यांनीं व्यक्त केलेले विचार कित्येकांस अप्रिय वाटले तरी ते मार्गदर्शक झाल्याविना रहाणार नाहींत. त्यांच्या विवेचनाचा गोषवारा थोडक्यांत खालीं दिला आहे.

श्री. जोशी म्हणाले, कीं सध्या हिंदुस्थान देश एका क्रांतिकारक संक्रमणावस्थेंतून जात आहे. समानतेची नवीन तहान देशांत निर्माण झालेली आहे. एंजिनिअर व त्यांचे मदतनीस ह्यांच्या स्थानांत आणि प्राप्तींत फार फरक असला तर त्यामुळें त्यांचे परस्परांचे संबंध नीट रहाणार नाहींत; आणि त्याचा परिणाम कामावर आणि कार्यक्षमतेवर झाल्याशिवाय रहाणार नाहीं. हिंदुस्थाननें २५ वर्षांच्या अवधींत आपला औद्योगिक विकास करून घेतला नाहीं तर हा देश कोणाचा तरी मांडलिक होईल. औद्योगिक विकासासाठीं मोठ्या प्रमाणावर शिक्षणाच्या सोयी, हजारो तात्पुरत्या इमारती आणि लहानसहान उद्योगधंद्यांची वाढ ह्या गोष्टींची अत्यंत गरज आहे. सध्या आपल्याला चांगल्या मालापेक्षां भरपूर माल उत्पन्न करण्याकडे अधिक लक्ष दिलें पाहिजे.

आपलें ध्येय कोणतें आणि तें किती काळांत साध्य करावयाचें ह्यावर आपली वार्षिक प्रगति अवलंबून आहे. आपणाला करावयाची प्रगति आणि आपल्या जवळील साधनें ह्यांच्या परस्पर प्रमाणावर आपल्या कार्याचा दर्जा ठरणार आहे. तथापि सध्याची तंग परिस्थिति आणखी विकोपाला जाऊं नये म्हणून कांहीं तांतडीचें कार्य उरकणें जरूर आहे. प्रयत्नांत एकसूत्रीपणा आला तर एका वर्षांत झालेलें कार्य पुढच्या वर्षीं करावयाच्या कामाचा पाया होऊं शकेल आणि त्यामुळें प्रगतीचा वेग चक्रवाढ व्याजाच्या गतिसारखा होईल. शिक्षणाचा प्रसार फार मोठ्या प्रमाणावर झाला पाहिजे. शिक्षणाच्या कोणत्याही अवस्थेंत प्रात्यक्षिकाची उपेक्षा केव्हांही होतां कामा नये, असें केलें तर तांत्रिक कुशलतेची आज भासणारी उणीव लवकर भरून निघेल. त्याचप्रमाणें शिक्षण हें एका ठराविक चाकोरींतून दिलें जाऊं नये. प्रत्येक विद्यार्थ्यांतील व्यक्तिमत्व शोधून त्याचा विकास शिक्षणानें झाला पाहिजे.

कोणत्याहि प्रश्नाकडे पहाणेचा आपला दृष्टिकोन शास्त्रीय, स्वतंत्र आणि नाविन्यपूर्ण असला पाहिजे. संशोधक दृष्टी जेथें असेल तेथून ती शोधून काढली पाहिजे. माहिती जास्तींत जास्त पसरेल आणि संशोधन अधिकाधिक वाढेल अशी व्यवस्था आपण केली पाहिजे. येथून पुढें औद्योगिक प्रांतांत सरकारचा हात अधिकाधिक शिरणार असल्यानें सार्वजनिक सुखसोयींची संघटन आमूलाग्र बदलणें प्राप्तच आहे. वरचा जबाबदार अधिकारी वर्ग लांचलुचपतीच्या नुसत्या संशयाच्या सुद्धां पलीकडे असला पाहिजे. हिंदुस्थाननें आपला विकास आपल्या पायावर उभा राहूनच केला पाहिजे. परदेशी माल आणि परदेशी तज्ज्ञ ह्यांची मोहिनी आपण दूर सारली पाहिजे. युद्ध चालू असतां किती तरी नव्या वस्तू हिंदुस्थानांत तयार होऊं लागल्या होत्या. परंतु आतां त्यांची जागा परकी माल घेऊं लागला आहे. आपण सिगरेट्स आयात करतो आणि तंबाखू निर्यात करतो; संमिश्र पोलाद आयात करतो आणि संमिश्र पोलाद तयार करण्यासाठी लागणारें मँगेनीज निर्यात करतो. ह्या सर्व गोष्टी आपणास हिंदुस्थानांत तयार करतां येतील. हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापाराचा मक्ता सरकारकडे असावा ह्याबद्दल कांहींही शंका नाहीं. परकीय तज्ञ कामाची हेळसांड व नासधूस करतील असा धोका असतांनाही, मोठमोठ्या बांधकामाची प्राथमिक पहाणी परकीय कंपन्यांकडून करवून घेण्यांत येत आहे. परकीय एंजिनिअर्सचा सल्ला—मग तो कसाही असो—घेऊन त्यांना भरमसाट पगार दिले जात आहेत. कंत्राटी कामांतही परकी कंपन्यांचीच वर्णी लागत आहे. परकीय देशांकडून यंत्रसामुग्री मागवितांना टेंडर्स मागविलीं जात नाहींत. शिवाय मजुरी व कच्चा माल ह्यांच्या किंमतींतील चढउतारामुळें यंत्रांची किंमत वाढविण्याची कूस राखलेली असतेच. महत्त्वाच्या जागांवर परकी तज्ञांची नेमणूक होत आहे. त्यांचें काम करूं शकणारे देशी एंजिनिअर्स व कंपन्या असतांनाही हा प्रकार चालूच आहे. एतद्देशीय कंपन्या व एंजिनिअर्स ह्यांच्यावर देशाच्या राजकीय पुढाऱ्यांचा विश्वास नाहीं.

परदेशी माल व तज्ञ ह्यांच्याबद्दल हिंदी सरकार व जनता ह्यांस फाजील आकर्षण कसें वाटतें ह्याबद्दल श्री. जोशी ह्यांनीं फारच मार्मिक विवेचन केलें आहे. "स्वातंत्र्ययुद्धांतील शेवटची लढाई जिंकण्यासाठी गुजरातनें हिंदुस्थानास "महात्मा" दिला, परंतु गुजरातचे सुपुत्र आपल्या बुद्धीचा आणि व्यवहारज्ञानाचा परदेशी मालाच्या एजन्सीज मिळविणें व विदेशी माल हिंदुस्थानांत खपविणें ह्यापेक्षा अधिक चांगला उपयोग करूं लागले, तरच हिंदुस्थानास खरें स्वातंत्र्य लाभेल" अशा तीक्ष्ण शब्दांत श्री. जोशी ह्यांनीं आपली तळमळ व्यक्त केली आहे. परदेशी मालाचें प्रतिनिधित्व मिळविण्याची व्यापाऱ्यांची धडपड पाहिली, म्हणजे मन विषण्ण होतें, असें श्री. जोशी म्हणाले. आपले लोक हिंदी मालापेक्षा भिकार परदेशी मालास प्राधान्य देतात ह्याबाबत सामान्य

जनतेस मार्गदर्शन करणारा राजकीय प्रचार बंदच झालेला दिसतो. हिंदी बनावटीचा माल चांगल्या दर्जाचा नसतो, ही कांहीं राजकीय पुढाऱ्यांची कल्पना चुकीची आहे; पैसे कमावणारे धंदेवाले आणि ज्यांस हिंदी मालापेक्षा परदेशी मालाचें ज्ञान जास्त आहे असे इंजिनिअर अधिकारी ह्यांच्या स्वार्थी सल्ल्यावरच ही कल्पना आधारलेली आहे. तरूण हिंदी इंजिनिअर्सच्या कामागिरीची माहिती करून घेण्याचा राजकीय पुढाऱ्यांनीं कधी प्रयत्नच केला नहीं अशी श्री. जोशी ह्यांची तक्रार आहे. शिक्षणासाठी कच्चे विद्यार्थी परदेशी पाठविल्यानें स्थानिक उत्पादनास चालना न मिळतां विदेशी मालाच्या आयातीस उत्तेजन मिळतें, हा श्री. जोशी ह्यांचा सिद्धांत त्यांनीं पुनः एकवार मांडला आहे. परदेशी मालाप्रमाणें विदेशी कंत्राटदार, इंजिनिअर, तज्ञ, ह्यांचेबद्दल सरकारास अद्याप जिव्हाळा वाटत रहावा, ह्याबद्दल श्री. जोशी ह्यांनीं खेद व्यक्त केला आहे, आणि त्याबाबत उदाहरणेंहि दिलीं आहेत. हौरा पूल, सक्करचें धरण, रोहरी पूल, भंडारधरा धरण, टाटा हायड्रोइलेक्ट्रिक वर्क्स, घाटांतील बोगदे, इत्यादींचा हिंदी इंजिनिअर्सना अनुभव असतांना आणि ब्रिटिश इंजिनिअरांचा दर्जा हिंदी इंजनिअरांपेक्षा वरिष्ठ नाहीं हें स्पष्ट असतांना, विदेशी "तज्ञांस" अजून मोकळें रान कां ठेवण्यांत यावें ? हिंदी तज्ञ कमी दर्जाचे आहेत असें गृहीत धरलें, तरी "राजकीय पुढाऱ्यांस चुका करण्यास मुभा असली तर इंजिनिअरांनाहि ती कां असूं नये" ? असा श्री. जोशी ह्यांचा राज्यकर्त्यांस सवाल आहे.

श्री. जोशी ह्यांनीं आपल्या स्वतःच्या धंद्याकडे मर्यादित दृष्टीनें कधीच पाहिलेलें नाहीं. इंजनिअर्सच्या संघटनेतून राष्ट्रीय वृत्तीस पोषक वातावरण निर्माण करण्याचा त्यांचा दीर्घकाळ प्रयत्न चालू आहे. इंग्रजी राजवटींत त्यांचें म्हणणें इंजिनिअर्सना पटलें तरी त्यांस तें गैरसोईचें वाटे आणि स्वतंत्र हिंदुस्थानांतहि पूर्वींची वृत्ति पूर्णपणें नाहींशी झालेली नाहीं. राज्यकर्त्यांनींच ह्याबाबत पुढाकार घेतला पाहिजे आणि व्यापक आणि दूरगामी राष्ट्रीय हितास प्राधान्य देऊन स्वदेशी मालास व तज्ञांस प्रोत्साहन दिलें पाहिजे. म्हणजे श्री. जोशी ह्यांच्या म्हणण्याप्रमाणें अनेक तरूण कार्यक्षम इंजिनिअर पुढें येतील आणि थोड्याच अवधींत सरकारास वाटणारा गैरविश्वास नष्ट होईल. परदेशी शिक्षण व विदेशी तज्ञ ह्यांच्या मागोमाग परदेशी मालहि आपोआपच येतो; तेव्हां हिंदी तरूण इंजिनिअर्सना वाव दिला तर स्वदेशी उत्पादनास आपोआपच चालना मिळेल; असा वाव थोडा धोका पत्करूनहि सरकारनें द्यावा, असा श्री. जोशी ह्यांच्या अनुभवाचा व विवेचनाचा मथितार्थ आहे.

---

### खरा इंजिनिअर कोणास म्हणावें ?

( जुन्या संस्कृत वाङ्मयांत दिलेलें खऱ्या इंजिनिअराचें खालील वर्णन श्री. जोशी ह्यांनीं परिषदेंतील आपल्या भाषणांत वाचून दाखविलें. )

स्थपतिः स्थापनार्हः स्यात् सर्वशास्त्रविशारदः ।
न हीनांगोऽतिरिक्तांगो धार्मिकश्च दयापरः ।
अमात्सर्योनसूयश्चातंद्रितस्त्वभिजातवान् ।
गणितज्ञः पुराणज्ञः सत्यवादी जितेंद्रियः ।
चित्रज्ञो देशकालज्ञश्चान्नदश्चाप्यलुब्धकः ॥
अरोगीचाप्रमादीच सप्तव्यसनवर्जितः ॥

मयमत अ. ५

## हिंदुस्थान सरकार, पाकिस्तान सरकार व रिझर्व्ह बँक

### रोख शिलकेवर अधिकार कोणाचा ?

हिंदुस्थानची फाळणी होण्यापूर्वीं हिंदुस्थान सरकारचे २७५ कोटी रुपये रिझर्व्ह बँकेमध्यें रोख शिल्लक होते. १४ ऑगस्ट १९४७ रोजीं फाळणी समितीनें ठरविलेले २० कोटी रुपये पाकिस्तानच्या खातीं सुरवातीची शिल्लक म्हणून वर्ग करण्यास हिंदुस्थान सरकारनें रिझर्व्ह बँकेस सांगितलें, आणि उरलेली २५५ कोटींची रकम हिंदी यूनियन सरकारची प्रारंभींची शिलक धरण्याबाबत रिझर्व्ह बँकेस सूचना दिली. शिलकेची वांटणी कायम स्वरूपाची नव्हती. पुढें शिलकेची पक्की वांटणी ठरून, पाकिस्तान सरकारला ५५ कोटी रुपये मिळावे असें निश्चित झालें. हिंदुस्थान व पाकिस्तान ह्यांचेमधील सर्व प्रश्न एकमेकांशीं निगडित असल्यानें ते मिटल्याखेरीज हे ५५ कोटी रुपये पाकिस्तान सरकारास देण्यास हिंदुस्थान सरकार तयार नाहीं, ही गोष्ट हिंदुस्थान सरकारच्या प्रतिनिधींनीं केव्हांच स्पष्ट केली होती.

पाकिस्तान सरकारचें म्हणणें असें, कीं रिझर्व्ह बँकेजवळील स्वतःची २५५ कोटींची शिल्लक रकम हिंदुस्थान सरकार वापरीत असून पाकिस्तान सरकारला मात्र त्याचे ५५ कोटी रुपये तें मिळूं देत नाहीं. ही रोख शिल्लक दोन्ही देशांच्या वतीनें राजा धारण करीत आहे आणि पाकिस्तानला त्याची न्याय्य रकम रिझर्व्ह बँकेनें देण्यामध्यें हिंदुस्थान सरकार आडकाठी आणीत आहे.

वरील आरोपास हिंदी अर्थमंत्र्यांनीं चोख उत्तर दिलें. ते म्हणतात, " आमच्या शिलकेंतून पाकिस्तानचे खातीं रकमा वर्ग करण्याबाबत आम्हीं रिझर्व्ह बँकेस कोणतीहि सूचना दिलेली नाहीं. बँकेनें हिंदुस्थान सरकारास एकाच बाबतींत म्हणजे पाकिस्तानला ५ कोटी रुपयांचें तात्पुरतें कर्ज देण्याविषयीं विचारलें, आणि ही बाब बँकेच्या अधिकारांतील आहे असें तिला हिंदुस्थान सरकारनें कळविलें. रोख शिल्लक राजा धारण करीत आहे, हें म्हणणें मूर्खपणाचें आहे. पाकिस्तानला प्रारंभीं २० कोटी रुपये देऊन उरलेली रकम हिंदुस्थान सरकारच्या खातीं जमा झाल्यावर, ह्या रकमेवर हिंदुस्थान सरकारचाच पूर्ण अधिकार आहे आणि त्याच्या हुकुमाबाहेर रिझर्व्ह बँक जाऊं शकत नाहीं. रिझर्व्ह बँक, ही हिंदी विधिमंडळाच्या एका कायद्यानें निर्माण झालेली संस्था आहे आणि रिझर्व्ह बँक कायद्याप्रमाणेंच तिचा कारभार चालावयाचा आहे. दोन्ही देशांची बँकर म्हणून रिझर्व्ह बँक काम करीत असली तरी तिचें कायदेशीर नातें हिंदुस्थान सरकारशीं ज्या स्वरूपाचें आहे त्या स्वरूपाचें पाकिस्तान सरकारशीं अजिबातच नाहीं. पाकिस्तानच्या अर्थमंत्र्यास ही कायदेशीर बाजू पूर्णपणें माहीत नाहीं असें दिसतें आणि वस्तुस्थितीच्या निवेदनांत तर ते फारच चुकले आहेत. काश्मीर प्रकरण व इतर बाबी यांविषयीं हिंदुस्थान सरकारचें समाधान झालें तरच आर्थिक कराराप्रमाणें हिंदुस्थान सरकार पुढें पाऊल टाकेल, हें पाकिस्तान बरोबरच्या सर्व वाटाघाटींत असंदिग्धपणें वेळोवेळ स्पष्ट करण्यांत आलेलें होतें. 'काश्मीर प्रकरणावर आर्थिक कराराची पूर्ती अवलंबून आहे, हें आम्हांस आधी समजलें असतें तर आर्थिक करारावर आम्हीं सह्या केल्याच नसत्या ' ह्या पाकिस्तानच्या अर्थमंत्र्यांच्या म्हणण्यास काय किंमत द्यावयाची हें जग ठरवीलच. आर्थिक कराराच्या अटी पाळण्यास आम्हीं तत्पर आहों, परंतु दोन्ही देशांमधील इतर सर्व प्रश्नहि त्याप्रमाणेंच सोडविले गेले पाहिजेत. शेजारच्या देशाच्या मंत्र्याच्या अरेरावी भाषणांनीं चिडून जाऊन योग्य मार्ग सोडण्याची चूक आम्हीं करणार नाहीं. "

इतकें वक्तव्य करूनहि, शनिवार ता. १७ रोजीं हिंदुस्थान सरकारनें रिझर्व्ह बँकेस सूचना देऊन पाकिस्तान सरकारच्या खात्याकडे ५५ कोटी रुपये वर्ग करविले.

## शेअरबाजार

( श्री. ब. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्. )

१९४७ सालभर जातीय दूषित वातावरणांत हाल काढून सालअखेरी, नियंत्रणें उठणार, खाजगी उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्यांत येणार असल्याची सरकारी घोषणा व "औद्योगिक तह" या गुटिकांनीं बाजार हुशार होऊं पहात होता तोंच हा हंत हंत! १९४८ सालच्या पहिल्याच बाजाराच्या दिवशीं अचानक घाला यावा त्याप्रमाणें बाजारावर सरकार कडक बंधनें तडकाफडकी आणणार या बातम्यांनीं भाव पाहतां पाहतां घसरले. ही केवळ स्वार्थसाधू मंदीवाल्यांनीं आणलेली गप्प ठरली व भाव थोडे सुधारले. पण त्याबरोबर हेंहि कळून आलें कीं हिंदुस्थान सरकार देशांतल्या सर्वच शेअरबाजारावर व विशेषतः ज्यामुळें सट्टेबाजी वाढते त्या बदला पद्धतीवर कांहींतरी नियंत्रण आणणारच. या बाबतींत झालेल्या वाटाघाटीवरून असें वाटत नाहीं कीं चालू तंत्रांत विशेष महत्त्वाचे फेरफार होतील. जर वायदा बंद करण्याचा सरकारचा हेतू नाहीं तर बदला बंद करता येणें अशक्य आहे. या दृष्टीनें भाव विशेष घसरण्याचें कारण दिसत नाहीं.

पण जानेवारीच्या पहिल्याच आठवड्यांत पुन्हा जातीय सैतानानें कराचीला थैमान मांडलें, व गुजरात स्टेशनवर निर्वासितांची कत्तल झाली. याबरोबर दोन्ही सरकारांतील मतभेद एकदम डोकें वर काढून पाकिस्तानला द्यावयाचे असलेले ५५ कोट रुपये देण्याचें युनियन सरकारनें नाकारलें, व पाकिस्तान विरुद्ध युनायटेड नेशन्सपुढें आपली फिर्याद मांडली. हें होतें न होतें येवढ्यांत महात्माजींचा उपवास सुरू होऊन बाजार दोन दिवस बंद राहिला. अशा प्रकारच्या गढूळ राजकीय वातावरणांत औद्योगिक दृष्ट्या भाव वाढण्यासारखे असले तरी वाढणें दुष्प्राप्य आहे. रविवारीं दुपारीं महात्माजींनीं उपवास सोडल्यानें एकंदर परिस्थिति सुधारावी व बाजारावर इष्ट परिणाम व्हावा, पण तेवढ्यानें गुंतविणारे आकर्षिले जातील असें दिसत नाहीं. युनोमध्यें फिर्यादीचा काय निकाल लागतो इकडे बाजारचें जास्त लक्ष लागून राहिलें असें दिसतें. नियंत्रणें उठलीं तर भाव वाढून नफे वाढतील. कांहीं कंपन्या बोनस शेअर देणार आहेत या भावनेनें गिरणविभाग टिकाव धरून आहे. तसेच भाव वाढवून मिळणार म्हणून टाटा टिकून आहे. पण यापुढें लवकरच अंदाजपत्रकी अनुमानाच्या हेलकाव्यांत बाजारचें तारूं सांपडणार आहे. तेव्हां एकूण भावांत विशेष वाढ होऊं नये असें वाटतें.

यापुढें देशांतर्गत परिस्थितीबरोबर बाजाराला आंतरराष्ट्रीय परिस्थितीला तोंड द्यावें लागणार आहे असा इशारा देणें जरूर आहे. प्रेसिडेंट ट्रुमन यांनीं नुकतेच अमेरिकेला आर्थिक मंदीचा धोका येऊं पहात आहे असें स्पष्ट शब्दांत जाहीर केलें आहे. इंग्लंडमध्यें नफील्ड मोटारवाल्यांनीं भाव उतरावयास सुरवात केली आहे. युरोपला मदत करणारी अमेरिकेची मार्शल योजना राशीया फलद्रूप करूं देण्याच्या मनस्थितींत नाहीं हें उघड झाल्यानें युरोपीय राष्ट्रांची क्रय शक्ति कशी वाढणार हा प्रश्नच आहे. सगळीकडे "सेलर्स मार्केट" संपलें आहे अशी भावना पसरली असून नित्योपयोगी जिनसांचा खप कमी होऊं लागला आहे. थोडक्यांत, सध्या कांहीं महिने तरी बाजाराला उत्तेजक परिस्थिति प्राप्त होणार नाहीं असा रंग दिसतो.

### क्लिअरिंग हाऊसचे आकडे

बाँबे बँकर्स क्लिअरिंग हाऊसमध्यें चेक्सच्या झालेल्या घडामोडींचे खालील आकडे उद्बोधक वाटतील:—

| वर्ष | चेक्सची संख्या | रकम (रु.) | प्रत्येक चेकची सरासरी रकम (रु.) |
|---|---|---|---|
| १९४६ | ८०,२२,९५४ | २८,२६,४०,१०,९३७ | ३,५२२ |
| १९४७ | ८१,९७,२५६ | २४,७७,१२,१६,६९२ | ३,०२१ |

चेक्सची संख्या कमी झाली त्या मानानें त्यांची रकम पुष्कळच उतरली, त्या कारणानें प्रत्येक चेकच्या सरासरी रकमेंत ५०० रुपयांची घट झाल्याचें वरील आकडे दर्शवितात. १९४८ सालीं ह्या प्रवृत्तीस आणखीच चालना मिळेल हें उघड आहे.

### काश्मीरमधील युद्धाचा रिझर्व्ह बँकेच्या पत्रकावर परिणाम

काश्मीरमधील लष्करी हालचालींसाठी रोज सुमारें १ कोटी रुपये खर्च येतो असें म्हणतात. हा मोठा खर्च करण्यासाठी व निर्वासितांच्या सुखसोईसाठी हिंदुस्थान सरकारास पैसा हवा, परंतु तो करांच्या किंवा कर्जाच्या मार्गे तात्काळ उभा होत नसल्याकारणानें प्रसृत चलनी नोटांत वाढ होणें स्वाभाविक आहे. अशा रीतीनें वाढ होत चालली आहे, तिची साप्ताहिक सरासरी ८ कोटी रुपये आहे. १९४७ सालीं सेवटें चलन कमी होऊं लागल्याचीं चिन्हें दिसत होतीं, परंतु आतां तें वाढूं लागलें आहे.

रिझर्व्ह बँकेनें पाकिस्तान सरकारला १० कोटींचें दोन हप्त्यांत मिळून तात्पुरतें कर्ज दिलें. त्यामुळें "सरकारांस कर्जे" ह्या खातीं पूर्वी कांहींच रकम दिसत नव्हती, ती आतां १० कोटी रुपये झाली आहे. पाकिस्तानला मिळालेली रकम त्या सरकारनें बँकेकडे ठेव म्हणून ठेवून ती जरूरीप्रमाणें काढली ह्याचेंहि प्रतिबिंब रिझर्व्ह बँकेच्या साप्ताहिक पत्रकावर पडलें आहे. बँकेच्याजवळील हिंदुस्थान सरकारची स्वाभाविकपणेंच ठेव कमी झाली आहे.

---

**लोकमान्य इंडस्ट्रीज लि.**— वरील कंपनी डॉ. एम. एन. नातू ह्यांनीं नोंदविली आहे, तिचा उद्देश रंगनिर्मिति आहे. भांडवल ५,००,००० रु. आहे.

**दक्षिण हिंदुस्थान-अमेरिका व्यापार**—दक्षिण हिंदुस्थानानें अमेरिकेला १९४७ सालीं १२ कोटी रुपयांचा माल विकला. त्यामुळें हिंदुस्थानला ३ कोटी, ५० लाख डॉलर्सचें चलन मिळालें. युद्धापूर्वी दक्षिण हिंदुस्थान अमेरिकेला ५ ते ६ कोटींचा माल विकीत असे. दक्षिण हिंदुस्थानांतील हस्तींनाही अमेरिकेंत मागणी आहे.

**निजाम सरकारनें २० कोटी रुपयांचे कर्जरोखे पाकिस्तानला वर्ग केले**—निजाम सरकारनें स्वतःजवळील २० कोटी रुपयांचे हिंदुस्थान सरकारचे कर्जरोखे पाकिस्तान सरकारला वर्ग केले आहेत. हिंदुस्थान व पाकिस्तान ह्यांचे संबंध बिघडण्यापूर्वीच हा व्यवहार पुरा झाला असून हिंदुस्थान सरकारला अडचणींत आणण्याचा त्यांत हेतू नव्हता व नाहीं, असा निजाम संस्थानच्या फडणविसांनीं खुलासा केला आहे.

**अमेरिकन चित्रपटांच्या निर्गतींत वाढ**—१९४७ च्या पहिल्या नऊ महिन्यांत अमेरिकेनें १९४६ च्या पहिल्या नऊ महिन्यांच्या मानानें पुष्कळच अधिक चित्रपटांची निर्गत केली. १९४७ अखेरच्या निर्गतीची किंमत १कोटी, १८ लक्ष डॉलर्सवर जाईल. १९४६ च्या निर्गतीच्या आकड्याचे मानानें हा आकडा ४५% नें मोठा आहे. सिनेमाविषयक साहित्याची निर्गतहि १५०% नें वाढली आहे.

पुणें सें. को. बँकेचा सहकारी सप्ताह

व्याख्यान २ रें, ता. २७-१०-४७

## सावकारी नियंत्रणें

( श्री. दा. वि. गोखले )

व्याख्यात्यांनीं त्यांचे व्याख्यानांत सरकारनें शेतकरी वर्गाची आर्थिक परिस्थितीची पाहणी करून अहवाल सादर करण्यासाठी ज्या निरनिराळ्या कमिट्या नेमिल्या त्यांचा थोडक्यांत वृत्तांत सांगून गाडगीळ व सरय्या रिपोर्टांचे बाबतींत अधिक विवरण केलें.

शेतकरी वर्गाचा कर्जाचा प्रश्न हा जन्मस्थ असून तो यशस्वी रीतीनें सुटल्याविना राष्ट्राची प्रगति होणार नाहीं असें त्यांनीं सांगितलें. सावकारी वर्गावर नियंत्रण घालून खाजगी मालमत्ता नष्ट केल्याशिवाय व शेतकरी वर्गाची जमीन वर्ग होण्यास अगर सावकाराकडे जाण्यास कायद्यानें प्रतिबंध केल्याशिवाय शेतकऱ्यास मनःस्वास्थ्य अगर स्वतःची शाश्वति वाटूं शकणार नाहीं. एकंदर शेतकरी कर्जाचा बोजाचा आकडा आज उपलब्ध होत नसला तरी तो फारच अवजड व अवाक्याबाहेर आहे व परिस्थिति मोठी निराशाजनक आहे. तथापि उपाययोजना करणें अत्यंत जरूर आहे. गाडगीळ कमिटीचा मुख्य रोख खालील बाबतींत सावकारावर नियंत्रण घालण्याचा आहे.

सावकाराची नोंद; सरकारमान्य हिशोब पद्धति, मर्यादित व्याजाचा दर, हिशोब देण्याची जबाबदारी व जरबेस सवाल मनाई. अशी गाडगीळ कमिटीनें शिफारस करून सरकारनें सरकारमान्य अशा संस्थांतून ( क्रेडिट कॉर्पोरेशन्स ) शेतकऱ्यांस सर्व प्रकारचें कर्ज वाजवी दरानें मिळण्याचे बाबतींत पुढाकार घेऊन व्यवस्था करावी. सहकारी चळवळीची सांप्रतची कुवत व विस्तारपद्धति पहाता चळवळीस हें काम पेलणार नाहीं असें त्यांनीं ( गाडगीळ कमिटी ) आपल्या रिपोर्टांत सांगितलें.

सरय्या कमिटीचे रिपोर्टाबाबत विवरण करतांना त्यांनीं सांगितलें कीं ही कमिटी प्रांतिक असून शेतकरी कर्जाचे बाबतींत व शेतकरी कर्ज व्यवहाराबाबत सहकारी चळवळ काय करूं शकेल ह्याचा सरय्या कमिटीनें सांगोपांग विचार करून समितीनें सहकारी चळवळीकडेच हा प्रश्न सोपवावा असें स्पष्टपणें आपलें मत प्रतिपादन केलें आहे. कारण प्रांतांतील प्रांतिक बँक व जिल्हा मध्यवर्ती बँका यांची आर्थिक परिस्थिति हे पेलण्या इतकी सुदृढ आहे असें आपल्या रिपोर्टांत समितीनें प्रतिपादन केलेलें आहे.

व्याख्यानाचे शेवटीं वक्त्यांनीं शेतकरी अर्थप्रश्न सोडवितांना सावकारी नियंत्रण, शेतकऱ्याच्या जमिनीच्या वर्गीकरणास कायद्यानें प्रतिबंध व जमिनीचे लहान लहान तुकडे करण्यास कायद्यानें प्रतिबंध या गोष्टींचें महत्त्व असून सरय्या समितीचे योजनेनुसार सहकारी चळवळीचें जाळें विणत गेल्यास परिस्थिति आशादायक आहे असें प्रतिपादन करून आपलें भाषण संपविलें.


















पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

### ब्रिटिश धंदेवाल्यांना हिंदुस्थानविषयक शिक्षण

हिंदुस्थान, पाकिस्तान आणि ब्रह्मदेश ह्या देशांकडे उद्योगधंद्यांच्या निमित्तानें जाणाऱ्या ब्रिटिश धंदेवाल्यांना शिक्षण देण्याची व्यवस्था लंडन विद्यापीठानें केली आहे. ह्या शिक्षणक्रमांत त्यांच्या देशांची भाषा, संस्कृति, इतिहास आणि सर्वसामान्य माहिती इत्यादी बाबींचा समावेश करण्यांत आला आहे. लंडन विद्यापीठाच्या पौर्वात्य देशविषयक शिक्षण खात्यातर्फे ही योजना करण्यांत आली असून तिचा मुख्य भाग जरी भाषाविषयक असला तरी ज्या देशांतून ह्या प्रतिनिधींना जावयाचें असतें त्या देशांच्या अनेक अंगोपांगांची माहितीही त्यांना देण्यांत येणार आहे. इंडिआ–बर्मा असोसिएशनच्या विनंतीनुसार हा अभ्यासक्रम सुरू करण्यांत आला आहे. आतांपर्यंत ४८ विद्यार्थी शिक्षणासाठी आले असून त्यांपैकीं ८ जणांनीं अभ्यासक्रम पुरा केला आहे.

अभ्यासक्रम १० आठवड्यांच्या काळांत खचून भरलेला आहे. ह्या अवधींत दर आठवड्याला १० तास एकादी राष्ट्रभाषा योग्य उच्चारासह शिकविण्यांत येते. ह्याशिवाय निरनिराळ्या ६० सांस्कृतिक विषयांवर व्याख्यानें देण्यांत येतात. सांस्कृतिक विषयांत धर्म, चालीरीती, खेड्यांचें जीवन, इत्यादी विषय आहेत. पाकिस्तान आणि हिंदुस्थान ह्यांच्याशीं व्यापारी संबंध असणाऱ्या ब्रिटिश कंपन्यांचें असें मत आहे कीं, अभ्यासक्रमासाठी खर्च होणारा पैसा व वेळ सत्कारणीं लागेल. ब्रिटिश कंपन्यांच्या हिंदुस्थानांत अगर पाकिस्तानांत येणाऱ्या नोकरांना ह्या अभ्यासक्रमांत चांगलें शिक्षण मिळतें. अभ्यासक्रमावर व्याख्याने देणारे व्याख्याते आपआपल्या विषयांतील तज्ञ असेच आहेत.

---

**सोव्हिएट रशिआचें नवें लॉटरी कर्ज**—सुमारें महिन्यापूर्वी सोव्हिएट रशिआंत शिधापद्धत बंद झाली आणि चलनी नोटाही बदलण्यांत आल्या. त्याचवेळीं एका नव्या लॉटरी कर्जाचीही घोषणा करण्यांत आली. कर्ज घेणारांनीं ३ टक्के व्याज अगर त्याऐवजीं बक्षिसें मिळणारे बॉंड्स यांपैकीं एक पत्करावयाचें आहे. बॉंड्सचीं बक्षिसें ४०० ते १,००,००० रूबल्सपर्यंत आहेत. कर्जाची मुदत २० वर्षांची असून सुमारें ७९ कोटी रूबल्स बक्षिसाच्या रूपानें वाटण्यांत येणार आहेत.

**पाकिस्तान–हिंदुस्थान अन्नधान्य–करार**—हिंदुस्थान सरकार आणि पाकिस्तान सरकार ह्यांच्यांत अन्नधान्यासंबंधीं एक करार झाल्याचें समजतें. हिंदुस्थानला पाकिस्तानकडून ४९,००० टन तांदूळ नियंत्रित भावानें मिळणार असून त्याबद्दल हिंदुस्थान पाकिस्तानला २३,५०० टन गहूं (कर्जाऊ घेतलेला) परत करणार आहे. ह्याशिवाय ४,५०० टन गहूं आणि १२ हजार टन बार्लीहि पाकिस्तानला मिळणार आहे. ही देवाण-घेवाण मार्च अखेर पुरी होईल. सप्टेंबर, १९४७ पासून आतांपर्यंत पाकिस्तानला हिंदुस्थानांतून साखर गेलेली नाहीं. कराराप्रमाणें १०,००० टन साखरहि पाकिस्तानला मिळणार आहे.

**नवा फॅक्टरी कायदा**—हिंदुस्थानच्या घटना समितीच्या कायदेमंडळी अधिवेशनांत १९४८ चें फॅक्टरी बिल मांडण्यांत आलें आहे. सध्यांचा फॅक्टरी कायदा १९३४ सालीं मंजूर झालेला आहे. नव्या बिलांत सर्व कारखान्यांसाठी कामगारांच्या आरोग्यविषयक, कामाच्या परिस्थितीबाबत, सुट्ट्याबाबत, हंगामी व कायमच्या, कामगारांमधील भेदाबाबत कायदेशीर व्यवस्था केलेली आहे. प्रत्येक कारखान्यानें प्रांतिक सरकाराकडून परवाना घेतला पाहिजे आणि तो नोंदला पाहिजे अशीहि तरतूद करण्यांत आली आहे.


## दि युनायटेड कमर्शिअल बँक लि.

**हेड ऑफिस : कलकत्ता**

पुणें शाखा : दाणे–आळी, पुणें २

**पुणें कँटोन्मेंट शाखा २० जानेवारी १९४८ रोजीं सुरू झाली.**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | ८ कोटी रु. |
| विक्रीस काढलेलें भांडवल : | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल : | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड : | ३० लक्ष रु. |

**डायरेक्टर्स**

जी. डी. बिर्ला
चेअरमन

एम. ए. इसपहानी, व्हॉईस चेअरमन — रमणलाल जी. सरय्या, व्हॉईस चेअरमन
अदमजी हाजी दाऊद — महादेव एल. डहाणूकर
अनंत चरण लॉ — मोहनलाल शहा
बैजनाथ जालन — मोतीलाल टापरिआ
ईश्वरी प्रसाद गोयेंका — नविनचंद्र मफतलाल
पी. डी. हिंमतसिंगका — मदनमोहन आर. रुइया

**बी. टी. ठाकूर**
**जनरल मॅनेजर**

**व्ही. आर. सोनाळकर**, डे. जनरल मॅनेजर — **एस. टी. सदाशिवन्**, डे. जनरल मॅनेजर
**ओ. एच. धीवाला**, रिजनल मॅनेजर — **व्ही. व्ही. गुप्ते**, मॅनेजर, पुणें शाखा

---

दी
## बँक ऑफ कोल्हापूर, लि.

*( कोल्हापूर येथें सन १९२६ सालीं स्थापन झालेली व भागीदारांची मर्यादित जबाबदारी असलेली. )*

एच. एच. दी छत्रपति महाराजासाहेब ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील.

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | | रु. | ४०,०६,५०० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | | रु. | १०,१६,००० |
| भरलेलें | (३०–६–४७) | रु. | ३,०५,४७० |
| रिझर्व्ह | (३०–६–४७) | रु. | ५,८६,६६० |

**एकूण खेळतें भांडवल रु. २,००,००,००० हून अधिक**

**मुख्य कचेरी**—बँक ऑफ कोल्हापूर बिल्डिंग, लक्ष्मीपुरी–कोल्हापूर.

**शाखा : संस्थानांतील**:—(१) शाहुपुरी–कोल्हापूर, (२) गुजरी–कोल्हापूर, (३) जयसिंगपूर, (४) इचलकरंजी, (५) पेठ–वडगांव, (६) मलकापूर, (७) गडहिंग्लज. **संस्थानाबाहेरील**:—(८) मुंबई, (९) निपाणी (जि. बेळगांव)

★ चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

★ योग्य तारणावर कर्जें, ओव्हरड्रॉफ्टस व कॅश क्रेडिटस दिलीं जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

★ मौल्यवान चीजवस्तु सुरक्षित ठेवणेसाठी हेड ऑफिसमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची उत्तम व्यवस्था.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

व्ही. ए. सावंत, अॅ. मॅनेजर

## शेती मालाच्या व्यापारांतील खासगी नफेबाजीचें उच्चाटन झालें पाहिजे

### मराठी शेतकऱ्यांच्या दारिद्र्यावर प्रा. धनंजयराव गाडगिळांचा तोडगा

महाराष्ट्र विभाग सहकारी परिषदेचें अधिवेशन शनिवार ता. १७ व रविवार ता. १८ रोजीं पुणें येथें प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांचे अध्यक्षतेखालीं पार पडलें. हिंदुस्थान सरकारचे मंत्री श्री. काकासाहेब गाडगीळ ह्यांनीं परिषदेचें उद्घाटन केल्यानंतर परिषदेचे स्वागताध्यक्ष श्री. य. द. खोले ह्यांनीं आपल्या भाषणांत प्रथम महाराष्ट्रांतील सहकारी चळवळीचा थोडक्यांत आढावा घेऊन गाडगीळ समिति, सरैया समिति व नाणावटी समिति ह्यांच्या अहवालांतून निष्पन्न होणाऱ्या निकडीच्या प्रश्नांचें दिग्दर्शन केलें. सहकारी कायद्यांतील आगामी सुधारणांचाहि त्यांनीं उल्लेख केला. मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष, सर जनार्दन मदन ह्यांनीं प्रास्ताविक भाषण केल्यानंतर अध्यक्ष, श्री. धनंजयराव गाडगीळ, हे स्वतःच गाडगीळ समितीच्या अहवालाचे सूत्रधार असल्याकारणानें त्यांच्या भाषणानें सद्यःस्थितीवर स्पष्ट प्रकाश पाडला ह्यांत नवल नाहीं. त्यांच्या भाषणाचें सार खालीलप्रमाणें आहेः—

सहकारी चळवळीची आजची परिस्थिति फारशी समाधानकारक नाहीं. सहकारी चळवळीची नियोजित प्रगति निश्चित कशी साधावयाची याचें धडसें उत्तर सरैय्या समिति, नाणावटी समिति, इ. सरकारी समित्यांनीं दिलेलें नाहीं, परंतु पुनर्घटनेच्या एकंदर उद्दिष्टाबद्दल बरीच एकवाक्यता आढळून येते. आजची गरज भागविणें व पुढील संभाव्य वाढत्या गरजांची तरतूद करणें हें क्रमाक्रमानें जास्त अवघड व महाग होत आहे, या स्थितीस सरकारी कायदेच (ऋणविमोचन कायदा, सावकारी नियंत्रण कायदा) बहुतांशीं कारणीभूत आहेत. पुनर्घटना योजना समग्र हातीं घेतल्याशिवाय केवळ कायद्यांच्या अंमलबजावणीचा दुष्परिणामच अधिक घडण्याचा संभव आहे.

ह्या बाबतींत कोणता मार्ग पत्करावा, हें मुंबई प्रांतांतील सहकारी कार्यकर्त्यांनीं गतवर्षींच ठरविलें. आज सहकारी बँकांवरच पुनर्घटनेची तपशीलवार योजना करण्याचा प्रसंग आला आहे. सनातन सहकारी तत्त्व व सहकारी संस्थांचें अधिकारस्वातंत्र्य एवढ्याच भूमिकांवरून ह्या प्रश्नाकडे पहाणें शक्य नाहीं. पीक कर्जाचा नवा प्रकार आतां सहकारी चळवळींत रूढ करण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहे, परंतु सहकारी कार्यकर्ते त्याबाबत साशंक आहेत. ज्या प्रदेशांत जमीन महसुलाचे पद्धतींतहि सूट व तहकुबीचें महत्त्व फार मानलें जातें, तेथें पीक कर्जाच्या वसुलींत वेळोवेळीं निदान तहकुबी द्यावी लागेल, हें गृहीत धरणेंच प्राप्त आहे. पीक कर्जाची वसुली, सावकारी व व्यापारी व्यवहाराची सांगड नीट घालण्यावर अवलंबून आहे. सहकारी खरेदी-विक्री व्यवहाराची आजची वाढ, सरकारी मदत व नियंत्रित व्यवहार यांमुळें केवळ घडून आली आहे; परंतु दोन महिन्यांत परिस्थितींत सरकारच्या पालटलेल्या धोरणामुळें कल्पनातीत बदल होऊन ह्या सहकारी संस्था आज उघड्या पडल्या आहेत. सहकारी संस्थांचा स्वखुषच्या व्यवहारावर कटाक्ष असला तरीहि सहकारी प्रगति व नियोजित अर्थव्यवस्था परस्परविरोधी नाहींत. अनिर्बंध व्यवहाराचा शेवट व शेतीमालाच्या किंमती इत्यादींबाबत सरकारचा पाठिंबा हें सहकारी चळवळीच्या वाढीस अनुकूल परिस्थितीचें महत्त्वाचें लक्षण आहे, असें सरैय्या समितीनें आग्रहानें व विस्तारानें प्रतिपादन केलें आहे. परंतु सहकारी संस्था रुजण्यास व वाढण्यास जो निवारा पाहिजे तो आतां पूर्णपणें नाहींसा झाला आहे व आर्थिक तेजी-मंदीच्या झंझावातांत आपण तगून राहूं, ही आशा फोल आहे. महाराष्ट्रासारख्या उजाड मुलुखांत तिला कांहींच घर नाहीं. अनिर्बंध व्यवहारांत केवढे मोठे धोके निर्माण होतात, हें आजच्या गुळाच्या उदाहरणावरून दिसतच आहे. परिस्थितीचा धोका खासगी व्यापारी व सहकारी संस्था या दोहोंस सारखाच असला तरी खासगी व्यापाऱ्यास उपलब्ध असलेलें भांडवल व मार्ग सहकारी संस्थांस उपलब्ध नाहींत, आणि खरा महत्त्वाचा विचार म्हणजे व्यवस्था कोणती शाश्वत रहाणार याबाबतचा. शेतमालाचा व्यापार सहकारी संस्थांचे हातीं राहिला नाहीं व आजचेंच धोरण कायम राहिलें तर आणखी चार-पांच वर्षांत मराठी शेतकऱ्याच्या वरचा बोजा १९३५-३६ सालइतकाच निदान होऊन तो जमिनीवरचे हक्क गमावून स्वतःच्याच (?) राज्यांत परका न होवो म्हणजे झालें.

आजचें हल्लींचें सरकारी धोरण कायम आहे तोपर्यंत सहकारी संस्थांची पायाशुद्ध उभारणी अशक्य व त्यांच्याकडून शाश्वत कार्य कांहीं होणार नाहीं. अनिर्बंध व्यवहार ही प्रकृति व नियंत्रण ही विकृति ह्या सरकारच्या धोरणाचा सर्व सहकारी कार्यकर्त्यांनीं निषेध केला पाहिजे. शेती-मालाचा घाऊक व्यापार, त्याचा साठा व त्यावरील प्राथमिक क्रिया ह्यांचें राष्ट्रीयीकरण केलें तरच आपला शेतकरी लुबाडला जाणें थांबेल. शेतीच्या मालांत वारंवार अगर मोठा फेरबदल होऊं न देणें हें सरकारचें आद्य कर्तव्य आहे. तें पार पाडण्यास सहकारी संस्था हें एकच प्रभावी व समाजहितपोषक साधन आहे. अडाणी व गरीब शेतकऱ्यास धूर्त व संपन्न खासगी व्यावसायिकांच्या कचाट्यांतून सोडविणें व वहातुक आणि यांत्रिक साधनांचा यथायोग्य उपयोग होणें या दोन्ही दृष्टीनें ह्या सर्व क्षेत्रांचें राष्ट्रीयकिरण झालें पाहिजे. सरकारी नियोजित कार्यक्रमांत सहकारी संस्थांचें स्थान काय हेंहि आपण स्पष्ट केलें पाहिजे. सबंध समाजाचें परिवर्तन घडवून आणण्यांत मोठा भाग उचलण्याची निकड मोठी आहे हें जाणून सहकारी कार्यकर्त्यांनीं सोवळी वृत्ति सोडून व्यापक व लोकसंग्राहक वृत्ति स्वीकारणें आणि स्वयंभूपणाचा हट्ट न धरणें अगत्याचें आहे.

## बँक ऑफ इंडिया लि., मुंबई

### १४% करमाफ डिव्हिडंड

३१ डिसेंबर १९४७ अखेर संपलेल्या वर्षीं, मागील रु. ७,२६,०४९-२-७ शिलकी नफा धरून व रु. १,२०,१७२-३,-० स्वातंत्र्य दिन बोनस देऊन बँकेस रु. ७९,४५,३५१-८-३ नफा झाला. त्यांतून इन्कमटॅक्स, सुपरटॅक्स व बिझिनेस प्रॉफिट टॅक्सच्या तरतुदीचे ३० लक्ष रुपये, व ३० जून १९४७ अखेरच्या सहामाहीच्या ६% इंटेरिम डिव्हिडंडचे रु. ९,००,०००-०-० वजा करतां वांटणीस रु. ४०,४५,३५१-८-३ उरतात. ३१ डिसेंबर १९४७ अखेरच्या सहामाहीसाठी ८% करमाफ फायनल डिव्हिडंड (म्हणजे वर्षासाठी १४% होतात) द्यावयाचा डायरेक्टरांचा विचार आहे, त्यास रु. १२,००,०००-०-० लागतील. बँकेच्या जमीन मालमत्ता खातीं रु. ३,५०,०००-०-०, सरकारी व इतर रोखे खातीं रु. १०,००,०००-०-०, शिल्लक (त्यांतून बोनसची तरतूद) रु. १४,९५,३५१-८-३ अशी एकूण रु. ७९,४५,३५१-८-३ ची विल्हेवाट आहे.

## सोव्हिएट रशिआंतील कर-पद्धति

लेखकः—ए. अँटोनोव्ह अनुवादकः—म. रा. जोग

### सहकारी संस्थांवरील कर

सोव्हिएट युनिअनमध्यें मुख्यतः दोन प्रकारच्या सहकारी संस्था आहेत. (१) उत्पादकांच्या औद्योगिक सहकारी संस्था आणि (२) समायिक शेतीच्या संस्था. औद्योगिक सहकारी संस्थांकडून घेण्यांत येणाऱ्या करांचें स्वरूप सरकारी मालकीच्या संस्थांकडून घेण्यांत येणाऱ्या करापेक्षा थोडें वेगळें आहे. सरकारी मालकीच्या संस्थांकडून त्यांच्या नफ्यांतील कांहीं भाग निरनिराळ्या प्रमाणांत नफ्यावरील कर म्हणून घेण्यांत येतो हें आपण पाहिलेंच आहे. सहकारी संस्था ह्या कांहीं सरकारच्या मालकीच्या नसतात; त्या लोकांच्या मालकीच्या असतात; सहकारी संस्थांच्या सभासदांच्या मालकीच्या असतात. अर्थातच, त्यांच्या नफ्यांतील कांहीं भाग कर म्हणून घेण्याचा सरकारला अधिकार नसतो. म्हणून औद्योगिक सहकारी संस्थांकडून उलाढालीवरील कर, सरकारी मालकीच्या संस्थांकडून घेण्यांत येतो त्याचप्रमाणें घेतला जातो. पण नफ्यावरील कराच्या ऐवजीं मात्र ह्या संस्था चढत्या भांजणीप्रमाणें प्राप्तीवरील कर देतात. नवीनच स्थापन झालेल्या सहकारी संस्थांना दोन वर्षांपर्यंत हा प्राप्तीवरील कर माफ असतो.

### समायिक शेतीवरील प्राप्तीचा कर

समायिक शेतें, म्हणजे शेतीच्या व्यवसायांतील सहकारी संस्थांपैकी एक प्रकार होय. समायिक शेती करणाऱ्या सहकारी संस्थांकडून उलाढालीवरील कर घेण्यांत येत नाहीं. त्यांना तो पूर्णपणें माफ असतो. इतर सहकारी संस्थांप्रमाणें त्यांना आपल्या नफ्यापैकीं कांहींही सरकारला द्यावें लागत नाहीं. त्यांच्याकडून फक्त प्राप्तीवरील कर घेण्यांत येतो. समायिक शेतीच्या उत्पन्नापैकी कित्येक भागावर मुळींच कर घेण्यांत येत नाहीं. सरकारला ठरलेल्या दरानें माल विकून जें उत्पन्न होतें त्यावर कर घेण्यांत येत नाहीं. अशा मालाच्या किंमती ठरवितांना त्यावर कर घेण्यांत येत नाहीं, ह्या गोष्टीचा साहजिकच विचार केलेला असतो. समायिक शेतीच्या चालकांना आपल्या शेतीवरील मालांतून गुरांची जोपासना करावयाची असते; सरकारी मालकीच्या यांत्रिक नांगरांच्या ठाण्यांकडून त्यांना मदत घ्यावी लागते; आणि समायिक शेतीला आनुषंगिक अशी इतरही सामुग्री घ्यावी लागते. ह्या सर्व बाबींवर होणाऱ्या खर्चावरही कर घेण्यांत येत नाहीं. मग ज्या उत्पन्नावर कर घ्यावयाचा त्याचे दोन भाग करण्यांत येतात. एका भागांत बीं-बियाणें, विमा-फंड, शिशुगृहें ह्यासाठी लागणाऱ्या वस्तूंचा अगर पैशाचा समावेश करण्यांत येतो. ह्या भागाला समायिक उत्पन्न अगर प्राप्ती असें म्हणतां येईल. दुसरा भाग समायिक शेतींतील सहकारी सभासदांना वाटण्यासाठी राखून ठेवला जातो. प्राप्तीच्या पहिल्या भागावर घेण्यांत येणाऱ्या कराची आकारणी करण्यासाठी त्याची पैशांत किंमत करण्यांत येते. सरकार सहकारी संस्थांकडून ज्या कमी दरानें माल विकत घेतें त्याच दरानें वरील किंमत करण्यांत येते. ह्याच्या उलट समायिक शेतींतील उत्पादनाचा जो भाग सहकारी सभासदांना वाटण्यासाठी राखलेला असतो त्याची किंमत अधिक दरानें करण्यांत येते. कारण सरकारला द्यावयाच्या ठरलेल्या मालापेक्षा अधिक जो माल विकला जातो त्याच्या किंमतीही अधिक ठरविलेल्या असतात. प्राप्तीच्या ह्या दोन भागावर मग दोन निरनिराळ्या दरानें कराची आकारणी केली जाते. पहिल्या भागावर म्हणजे समायिक उपयोगासाठीं वापरल्या जाणाऱ्या प्राप्तीवर ४ टक्के कर घेण्यांत येतो; आणि दुसऱ्या भागावर ८ टक्के घेण्यांत येतो. ह्यावरून हें दिसून येतें कीं सोव्हिएट समायिक शेतकऱ्यांवर कराचा बोजा फारच थोडा पडतो.-सोव्हिएट सरकारकडून, समायिक शेतकऱ्यांना शेतजमीन वहिवाटण्याची कायमची देणगी मिळते आणि त्याबद्दल त्यांना खंड असा मुळींच द्यावा लागत नाहीं. सोव्हिएट सामायिक शेतकऱ्यांच्या संस्थांचें उत्पन्न खूप वाढलेलें आहे. १९४० सालीं सोव्हिएट सरकारच्या अंदाजपत्रकांत ८० कोटी रूबल्स ह्या संस्थांनीं दिलेल्या कराच्या रूपानें आलेले होते. अत्यंत कमी कर देऊनही सरकारी अंदाजपत्रकांत एवढी मोठी भर ह्या संस्थांनीं घातली ह्यावरून त्यांचें उत्पन्न किती वाढलें असेल ह्यांची कल्पना येईल.

---

### ब्रिटिश मोटारींच्या निर्यातीची योजना

ब्रिटनच्या निर्यात व्यापारांत मोटारींना बरेंच वरचें स्थान आहे. सध्या ह्या धंद्याचा विस्तार करण्याचें काम चालू असून यंत्रसामुग्रीच्यों खालोखाल निर्यातींत मोटारींचाच अनुक्रम लागतो. ऑक्टोबर १९४७ मध्यें ब्रिटिश मोटार-कारखान्यांनीं ८,७,२२,००० पौंड किंमतीचा माल परदेशीं विकला. दुसऱ्या महायुद्धापूर्वीच्या मासिक सरासरीपेक्षां हा आकडा ६ पटींनीं अधिक आहे. ऑक्टोबर महिन्यांत ब्रिटननें १५,२१६ मोटारी निर्यात केल्या. (१९३८ सालची मासिक सरासरी ५,६८४ होती.) ह्या महिन्यांत ब्रिटिश मोटार-कारखान्यांतून दर आठवड्याला सरासरी ६,५०० मोटारी तयार झाल्या. त्याचप्रमाणें इतर प्रकारच्या मोटारींच्या उत्पादनांतही वाढ झाली. व्यापारी ने-आणीसाठी लागणाऱ्या मोटारींचें उत्पादन १४,०९२ इतकें झालें (१९३८ सालची मासिक सरासरी ९०० होती.) व शेतीसाठी लागणारे यांत्रिक नांगर १४,५७८ तयार झाले. हे आकडे १९४७ सालांतील तिसऱ्या तिमाहीचे आहेत. १९४८ सालीं ह्या धंद्याचा विस्तार करण्याच्या ज्या योजना आहेत, त्याचा पाया म्हणून वरील आकडे धरण्यांत आला आहे. मोटारीला लागणारे विविध भाग सोप्या तऱ्हेनें आणि मोठ्या प्रमाणावर तयार करता यावे म्हणून त्यांचा दर्जा व प्रकार ह्याच्यांत एकसूत्रीपणा आणण्यांत येणार आहे.

१९३९ सालीं मोटारींचे १३६ निरनिराळे नमुने होते ते आतां फक्त ६२ ठेवण्यांत येतील आणि ह्यापुढील १२ ते १८ महिन्यांत तर नमुन्यांची संख्या ४२ वर आणून ठेवण्यांत येईल. ज्या कारखान्यांत थोड्या पण अधिक उच्च प्रतीच्या मोटारी तयार होतात त्यांना मात्र वरील चौकटींतून वगळण्यांत आलें आहे. नवीन मोटारींतून सुट्या भागांची संख्याहि कमी करण्यांत आली आहे. ब्रिटिश बनावटीच्या मोटारींचें सुटे भाग ह्यामुळें अधिक सुलभतेनें मिळूं शकतील. तथापि मोटारींचा दर्जा आणि प्रकार ह्यांच्यांत एकसूत्रता आणतांना त्यांच्या गुणांत कमतरता येणार नाहीं अशी दक्षता घेतलेली आहे. मोटारीचा रंग, बाह्य आकार, इत्यादींबाबत विविधता कायम ठेवण्यांत येणार आहे. नवीन योजनेप्रमाणेंच ऑस्टिन, हंबर, सिंगर इत्यादि गाड्या तयार होणार आहेत. योजनेप्रमाणें, १९४८ सालीं ब्रिटिश मोटार कारखान्यांतून ३,१०,००० ते ३,१५००० इतक्या मोटारी निर्यातीसाठी आणि ९०,००० ते १,००,००० इतक्या घरच्या बाजार पेठेसाठीं तयार होतील असा अंदाज आहे.

---

देवकरण नानजी बँकिंग कंपनी लि.—वरील बँकेस १९४७ सालीं ४,९२,५१३ रु. नफा झाला. प्रत्येक भागास १ रु. ८ आ. करमाफ डिव्हिडंड मिळणार आहे.

### लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें
( एप्रिल ते डिसेंबर १९४७ )

( १ ) रावसाहेब भा. वि. घरपुरे हे परदेशीं गेले आहेत, त्यांचे जागीं श्री. पु. ग. काशीकर हे क्युरेटर म्हणून काम पहात आहेत.

( २ ) पुणें नगरपालिकेनें संग्रहालयास दिलेल्या चार एकर जागेमध्यें स्वातंत्र्यप्राप्तीच्या शुभ दिनीं पिंपळ, वड, कडुनिंब, आंबा इ. २०२५ झाडें लावण्यांत आलीं आहेत.

( ३ ) कै. जमशेटजी टाटा जन्मदिनोत्सवानिमित्त दि. ३ मार्च १९४७ रोजीं संग्रहालयानें भरविलेलें पेटन्ट व शोध यांचें प्रदर्शन पुणें उपनगरपालिकेच्या दिवाणखान्यांत तीन महिने ठेविल्यानंतर गोखले हॉलमध्यें दोन–तीन महिने ठेवण्यांत आलें होतें. त्याचें प्रदर्शन हें रूप आतां बदलून संग्रहालयाचा एक कायमचा विभाग म्हणून कॉमनवेल्थ इमारतींतील संग्रहालयाकडे असलेल्या दिवाणखान्यांत आतां तो मांडण्यांत आला आहे.

( ४ ) संग्रहालयाच्या शिक्षण-विषयक व्याख्यानमालेंत तज्ज्ञांचीं व्याख्यानें करविण्यांत आलीं. शिक्षण संस्थांतील ३१३ वर्गांस संग्रहालय दाखविण्यांत आला व संग्रहालयांत मांडलेल्या निरनिराळया विषयांवर व्याख्यानरूपानें त्यांस माहिती देण्यांत आली.

( ५ ) ग्रंथालयाकडे सध्यां येत असलेल्या नियतकालिकांची संख्या १०१ आहे. या शिवाय ग्रंथालयाच्या ग्रंथसंपत्तींत या मुदतींत जवळ जवळ १७५ नवीन पुस्तकांची भर पडली आहे.

---


### पाकिस्तानांत इन्स्टिटयूट ऑफ बँकर्सची स्थापना

पाकिस्तानांतील बँकांना सध्यां तज्ञ अधिकाऱ्यांची व नोकर वर्गाची-वाण भासत आहे. पाकिस्तानांतील बरेच हिंदु बँक-अधिकारी निघून गेल्यामुळें तर ही टंचाई पडलीच आहे; परंतु पाकिस्तानांतील औद्योगिक विस्ताराबरोबर बँकांचाही विस्तार होणें आवश्यक असल्यामुळें अशा अधिकाऱ्यांची वाण भविष्यकाळींही आणखी पडण्याचा संभव आहे. ह्या परिस्थितीचा विचार करून उपाययोजना आखण्यासाठी पाकिस्तानचे अर्थमंत्रि, मि. गुलाम महंमद ह्यांच्या अध्यक्षतेखालीं नुकतीच एक बैठक झाली. ह्या बैठकीला पाकिस्तानचे व्यापारमंत्रि, मि. चुंद्रिगरही हजर होते. ह्याशिवाय कराचींतील प्रमुख बँकांचे प्रतिनिधीही उपस्थित होते. बैठकींत करण्यांत आलेल्या सूचनांत, पाकिस्तानांत एक इन्स्टिटयूट ऑफ बँकर्स ह्या नांवाची संस्था काढावी व तिच्यामार्फत एक शिक्षणकेंद्र उघडावें अशी एक सूचना आहे. तिच्या तपशिलाचा विचार करण्यासाठी एक कमिटी नेमण्यांत आली आहे.

---

### दि महाराष्ट्र मेटल अँड जनरल मिल्स लि., सांगली

वरील कंपनी मुख्यतः तांबा, पितळ व इतर धातूंपासून पत्रे, भांडीं, फर्निचर व फिटिंगजच्या कामीं उपयुक्त वस्तू, मशिनचे सुटे भाग, वगैरे विविध वस्तूंची निर्मिति व खरेदी- विक्री करण्याचे उद्देशानें स्थापन झाली आहे. दि यूनियन एजन्सीज ( भागीदार: श्री. र. बा. रासने, पुणें; श्री. श्री. तु. वनकुद्रे, कोल्हापूर व श्री. बा. ना. गरगटे, सांगली ) कडे मॅनेजिंग एजन्सी आहे. रोलिंग, प्रेसिंग, कास्टिंग व फिनिशिंग अशा मशीनपद्धतींनीं युक्त असा कारखाना कंपनी काढणार आहे. लवकरच प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ होईल पुणें सोडलें तर इतरत्र ह्या भागांत अशा तऱ्हेचा यंत्रसिद्ध कारखाना नाहीं. सांगली दरबारनें आपल्या ' औद्योगिक विभागां'त चार एकर खुली जागा योग्य किंमतीस कंपनीस दिली आहे व इतर सवलतीहि मिळणार आहेत. रत्नाकर बँक, रत्नाकर इंडस्ट्रीज, इ.चे डायरेक्टर नामदार बी. बी. पाटील, बी. ए., एलएल. बी., डेव्हलपमेंट मिनिस्टर सांगली स्टेट, हे कंपनीचे चेअरमन आहेत.




दि
## बँक ऑफ इंडिया, लि.
**स्थापना १९०६**

खपलेलें भांडवल :– ३,००,००,०००.
वसूल झालेलें भांडवल :– १,५०,००,०००.
राखीव फंड :– २,००,००,०००.
मुख्य कचेरी :–ओरिएंटल बिल्डिंग्ज, मुंबई.

इतर शाखा :– मुंबई:– बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबा देवी व मलबार हिल. मुंबई नजीक:–बांद्रे व अंधेरी. अहमदाबाद:–भद्र ( मुख्य शाखा), इलिस ब्रिज, माणिक चौक व स्टेशन शाखा. कलकत्ता :–क्लाइव्ह स्ट्रीट ( मुख्य शाखा ), बडा बाजार व चौरंगी स्क्वेअर. नागपूर:–किंग्जवे व इतवारी बाजार. पुणें:–लष्कर व शहर. मद्रास, कोईमतूर, कालिकत, अमृतसर, भुज (कच्छ), हैद्राबाद ( सिंध ), जमशेटपूर, जुनागड, कराची, पालनपूर, राजकोट, सुरत, सोलापूर, वेरावल.

लंडन शाखा :– १७ मूरगेट, लंडन ई. सी. २.

न्यूयॉर्क एजंट्स :–दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

डायरेक्टर्स :–सर कासवजी जहांगीर, बॅरोनेट, जी. बी. इ., के. सी. आय. इ. चेअरमन; श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. ए. गेडिस, मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण, ना. सर शांतिदास अस्करन, नाइट, मि. महंमद सुलेमान कासम मिठा, सर किकाभाई प्रेमचंद, नाइट, श्री. भगवानदास सी. मेहता.

चालू ठेवींचें खातें:—कांहीं ठिकाणें सोडून रोजच्या रु. ३०० ते रु १ लक्ष पर्यंतच्या शिलकेवर दरसाल द. शें. एकचतुर्थांश रु व्याज देण्यांत येतें. रु. १ लाखाहून जास्त शिलकेवर खास योजनेनें व्याज दिलें जातें. सहामाही व्याज रु. ५ पेक्षा कमी झाल्यास तें दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग्ज बँक ठेवी योग्य अटींवर स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें. बिल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

बी. एन्. अटल, एजंट, पुणें.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
स. रा. श्रीपाद वामन् काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.